**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**क्रिडा विभाग**

**जाहिर सुचना**

ठाणे महानगरपालिकेच्या तरणतलाव विभागाकरिता जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची कंत्राटी पध्दतीने मानधनावर नेमणुक करणेकरिता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या कै. मारोतराव शिंदे तरणतलाव व कै.यशवंत रामा साळवी तरणतलाव, कळवा या येथे कंत्राटी पद्धतीने मानधनावर जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याकरिता नेमणुक करण्यासाठी खालील अटी/शर्तीस अधीन राहुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अटी/शर्ती**

१) सदर तरणतलाव विभागासाठी ४ पुरूष जलनिर्देशक/जलजिवरक्षक व २ महिला जलनिर्देशक/जलजिवरक्षक निवड करण्यात येईल.

२) सदरच्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची नावे निश्चित करतांना अटी/शर्ती नुसार त्यांची शैक्षणिक पात्रता/अनुभव व सदर कामाकरिता आवश्यक असलेले प्रमाणपत्र या नुसार प्राधान्य देण्यात येईल.

३) उपरोक्त निवड प्रक्रियेत उमेदवार हा राष्ट्रीय,राज्यस्तरीय पातळीवर जलतरण स्पर्धेत सहभाग घेतलेला असावा.

४) उमेदवाराची शैक्षणिक अर्हता किमान १०वी ची परिक्षा पास असणे आवश्यक आहे.

५) उमेदवार शासकिय अथवा निमशासकिय संस्थेमधुन खेळाडु म्हणुन खेळले असल्यास सदर उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

६) जलनिर्देशक/जलजिवरक्षक या पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवाराकडे लाईफगार्ड चे प्रमाणपत्र असणे आवश्यक असेल.

७) जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची नियुक्ती शासनाने सुचीत केल्या प्रमाणे विहित नियमानुसार करार पध्दतीने असतील त्यांना सेवेत कायमस्वरुपी करण्यासाठी दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

८) निवड झालेल्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांना नियमीत सराव बॅचच्या वेळेत सराव घेण्याकरिता उपस्थित राहणे आवश्यक असेल.

९) जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची कार्यालयीन वेळ सकाळी ०६:०० ते सकाळी १०:०० व दुपारी ०४:०० ते रात्रौ ०८:०० असेल.

१०) निवड झालेल्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांना प्रती महीना **रू.१४,०००/-** या प्रमाणे ठोक मासिक मानधन अदा करण्यात येईल.

११) निवड झालेल्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांना मासिक मानधन व्यतिरिक्त महापालिकेच्या नियमित कर्मचाऱ्याप्रमाणे इतर कोणतेही हक्क, अधिकार लाभ, मिळणार नाहीत.

१२) सोमवार साप्ताहिक सुट्टी व्यतिरिक्त आपणांस कोणताही भत्ता, कायमपणाचे कोणतेही फायदे तसेच कोणत्याही प्रकारच्या रजेचा लाभ घेता येणार नाही.

१३) सदरची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याकरिता असेल.

१४) सभासदांना सराव देता दरम्यान निवड झालेल्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांना दुखापत झाल्यास त्यावरीत उपचार ठाणे महानगरपालिका रूग्णालयात मोफत करण्यात येईल.

१५) उपरोक्त प्रमाणे अर्हता धारण करणाऱ्या उमेदवाराच्या कागदपत्रांची छाननी करून पात्र उमेदवाराच्या ठाणे महानगरपालिकेच्या तरणतलावावर ठाणे जिल्हा जलतरण संघटनेच्या प्रतिनिधी मार्फत जलतरणाची चाचणी घेण्यात येईल. त्या मधुन अंतिम जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांची निवड करण्यात येईल.

१६) सदर पदाच्या ११ महिन्याकरिता कंत्राटी पद्धतीने मानधनावर नेमणुकीकरिता पात्र उमेदवारास उपरोक्त अटी/शर्ती नुसार रू.१०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामर करणे बंधनकारक आहे.

१७) निवड झालेल्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक जर अपेक्षित कामगिरी करत नसल्यास त्यांचा करारनामा रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त सो। यांना असतील.

१८) सदरचे अर्ज दि.१७/०६/२०२२ पासुन दि.२४/०६/२०२२ पर्यंत स्विकारण्यात येतील, मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

उपरोक्त प्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या जलनिर्देशक/जलजिवरक्षक यांनी जलतरण संबंधित प्राविण्य प्रमापत्राच्या प्रमाणित छायांकित प्रतीसह खालील पत्यावर अर्ज सादर करावेत.

अर्ज करताना लिफाफ्यावर "जलनिर्देशक/जलजिवरक्षक म्हणुन नेमणुक करणेकरिता" त्या बाबत ठळक अक्षरात नमुद करावे.

**अर्ज करण्याचा कार्यालयाचा पत्ता:-**

**नागरी सुविधा केंन्द्र,**
**तळ मजला, प्रशासकिय भवन,**
**ठाणे महानगरपालिका, (मुख्यालय),**
**चंदनवाडी, पांचपाखाडी,**
**ठाणे.(प)४००६०१**

(मिनल पालांडे)
क्रिडा अधिकारी/प्र-उपआयुक्त(क्रिडा)
ठाणे महानगरपालिका, ठाणे